ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# २१ व्या शतकातील शिक्षकाची भूमिका

**डॉ. के.के. जाधव**
*प्राचार्य, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आगसखिंड, ता. सिन्नर, जि. नाशिक.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

२१ व्या शतकांत विज्ञानात प्रचंड परिवर्तन होत आहे. प्रत्येक क्षणाला परिवर्तन होत आहे. आताचे ज्ञान जुने होऊन क्षणात नवीन ज्ञानाची निर्मिती होत आहे. २१ व्या शतकांत शिक्षक हा अपेक्षित भविष्यवेत्ता व द्रष्टा असला पाहिजे. उद्याची समाजाची नेमकी काय गरज आहे, उद्याची व्यक्ती समाजाला कशी अपेक्षित आहे, ती तयार करण्याची क्षमता शिक्षकात असावी.

जगात मोठमोठी स्थित्यंतरे घडत आहेत. जागतिकीकरण होऊन राष्ट्रांराष्ट्रांतील ऐक्यभावनेचे दृढीकरण झपाट्याने होत आहे. विद्यार्थीसुध्दा जगात सर्वत्र जाऊन ज्ञान मिळविण्याची धडपड करीत आहेत. दुसऱ्या देशातील विद्यार्थी आपल्या देशात आले आहेत. शिक्षकास त्या विद्यार्थ्यांची ज्ञानात्मक भूक भागविता आली पाहिजे. शिक्षकाने केवळ पारंपारिक अध्यापन न करता अध्यापनाची नवनवीन तंत्रे वापरून सुयोग्य अध्यापनाची भौतिक साधने विकसित केली पाहिजेत.

विद्यार्थ्याला केवळ बौध्दिक ज्ञानावर अवलंबून न ठेवता विद्यार्थ्यांचे अष्टांग व्यक्तिमत्त्व तयार करावयाचे आहे. बदलत्या काळानुरूप विद्यार्थ्याला विविध कौशल्यांना व ज्ञानानुभूती शिक्षकाने द्याव्या लागतील.

शिक्षकाच्या शिक्षक–प्रशिक्षणात काळानुसार कसे बदल होतात यावर संशोधन केले पाहिजे. संशोधनाच्या माध्यमातून ज्ञानाचे सुलभ प्रसारण करता आले पाहिजे. शिक्षकाला आपली भूमिका बजावित असताना नियमानुसार (Work of Rule) काम करावे लागेल.

शिक्षकाला केवळ संख्यात्मक विकासाकडे लक्ष न देता गुणात्मक विकासाकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे लागेल. गुणात्मक विकास करीत असतांना आपण केलेल्या कामाचे स्वतः मूल्यमापन करून त्या कामातील कच्चे दुवे उपचारात्मक अध्यापनातून नष्ट करावे लागतील.

राष्ट्रांच्या अभिप्रेत उद्दिष्टाला तडा जाणार नाही याकडे शिक्षकाने लक्ष दिले पाहिजे. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, अखंडत्व व धर्मनिरपेक्ष या भावनांची रुजवण करावी लागेल. शिक्षकाला शाळा ही समुदाय विकासाचे केंद्र तयार करून विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जावी लागेल.

सामाजिक कामातून धर्माधर्मामध्ये अंतर न मानता मानवता हाच खरा धर्म आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यावी लागेल. समाज हा गतिशील झाला आहे. समाजात लवचीकता आली आहे. आंतरजातीय, आंतरधर्मीय, आंतरप्रांतीय अशा भावनांना प्रोत्साहन देण्याची क्षमता शिक्षकात असावी. जग अत्यंत जवळ आले आहे. कामाचा वेग वाढत आहे. ज्ञानाची दारे सर्वत्र खुली झाली आहेत. २१ व्या शतकांत शिक्षकाने व्यावसायिक गतिशीलता निर्माण केली पाहिजे. आपल्या देशाच्या अस्तित्वाकरिता, देशाच्या हितासाठी व देशाच्या आव्हानांना तोंड देण्याची क्षमता विद्यार्थ्यांत निर्माण केली पाहिजे.

राष्ट्राची वैभवशाली परंपरा, संस्कृती याचे जतन करण्यात आले पाहिजे. राष्ट्राच्या सार्वजानिक संपत्तीचे, समाजाचे हित व अहिंसचे जतन करण्यात आले पाहिजे. जागतिकीकरणातील चांगल्या बाबी स्वीकारून उदारीकरण व खाजगीकरणाला योग्य प्रोत्साहन दिले पाहिजे.

## २१ व्या शतकातील शिक्षकांचा व्यावसायिक कौशल्याचा विकास
## (Development of 21st Century Skills in Teacher)

२१ व्या शतकांत शिक्षक हा व्यावसायिक झाला आहे. शिक्षकी पेशा किंवा व्यवसाय हे एक व्रत आहे. त्यात विद्यावान ही कल्पना सामावलेली आहे. भूदान, संपत्ती दान, रक्तदान, नेत्रदान, अन्नदान यांपेक्षाही ज्ञानदान श्रेष्ठ समजण्यात येते. आधुनिक काळात शिक्षकी पेशा हा पैसा कमविण्याचे साधन म्हणून निर्माण झाला आहे. खाजगी शिकवण्यांच्या माध्यमातून मोठया प्रमाणात अर्थार्जन केले जाते. आज शिक्षक जरुरीपेक्षा जास्त प्रमाणात अर्थार्जन करीत आहे. आजच्या काळात चांगल्या शिक्षकाला प्रचंड मागणी आहे. किंबहुना चांगल्या शिक्षकाची कमतरता आहे. शिक्षकी पेशा हे सेवाव्रत मानले जात होते. पण आज त्याला व्यवहारी स्वरुप प्राप्त झाले आाहे. खरेतर शिक्षकी पेशा हा आत्मिक समाधान करून देणारा व्यवसाय आहे. सेवाभावी वृत्तीने समाजपरिवर्तनाचे काम शिक्षक करीत आहे. खरेतर राष्ट्र उभारणीकरिता प्रथम शिक्षक बदलला पाहिजे. त्यातून राष्ट्र बदलणार आहे. समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा नित्यानंद शिक्षकी पेशातून मिळत राहतो.

शिक्षकी पेशात मानवी घटक असल्यामुळे, त्याच्या सहवासातून हा पेशा सतत चिरतरूण राहतो. बाळगोपाळांचा सहवास म्हणजे सतत चैतन्याचा व आनंदाचा सहवास होय. कारण सतत आनंद, चैतन्य, दुःख, करुणा, प्रेम, वात्सल्य त्याच्या आशा–आकांशा इत्यादींच्या छायेत शिक्षक राहत असल्यामुळे त्याच्या जीवनात सतत नवचैतन्य लाभत असते. त्यानुरूप शिक्षक सतत ऊत्साही असला पाहिजे. शिक्षक शरीराने जरी थकला तरी मनाने कधीही थकता कामा नये. कारण नवतारुण्याचा सागर सतत त्याच्या डोळयांसमोर असल्यामुळे त्या सुकोमल बालकांना शिक्षकाने सतत फुलवित राहिले पाहिजे.

शिक्षकाला फुरसतीचा काळ भरपूर मिळत असल्यामुळे उरलेल्या काळात त्याने ज्ञानवृध्दीचे काम केले पाहिजे. सतत नवनवे अनुभव विद्यार्थ्यांना शिक्षकाने दिले पाहिजेत. आपली व्यावसायिक कार्यक्षमता सतत वाढविली पाहिजे. शिक्षकाने स्वतःच्या उन्नतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या उन्नत्तीची काळजी घेतली पाहिजे व नवी पिढी सक्षम बनविली पाहिजे.

समाजात पालक आपल्या पाल्यांना चांगले शिक्षक, चांगली शाळा मिळविण्यासाठी धडपडत असतात. पण आपल्या पाल्याने शिक्षक मात्र बनू नये याची काळजी घेतात. इतकेच नव्हे तर शिक्षकी व्यवसायात असणारे शिक्षकसुध्दा आपल्या पाल्यांना शिक्षक करीत नाहीत.

दुसरीकडे समाजाकडून मात्र चांगल्या शिक्षकाची अपेक्षा करीत असतात. या दृष्टचक्रात शिक्षकी व्यवसाय सापडला आहे. आज मात्र, हे शिक्षणचक्र हळूहळू बदलत आहे. चांगले बुध्दिमान विद्यार्थी या व्यवसायाकडे वळू लागले आहेत.

शिक्षकी पेशा हा सचेतनाला घडविणारा तसेच समाजाला सचेतना देणारा व्यवसाय आहे. शिक्षकी व्यवसायात तपश्चर्या आहे. एक साधना आहे. विद्यार्थी घडविण्याचा मोठा आनंद आहे. फार मोठे आत्मिक समाधान आहे. समाजातील घटकाला इतका निस्वार्थी व सेवाभावी वृत्तीने तसेच पारंपारिक रूळलेली वाट, मळलेली वाट सोडून विद्यार्थ्यांना नव्या पाऊलवाटेने जाण्याचे सामर्थ्य हे शिक्षकात आहे. म्हणून हा व्यवसाय पवित्र व उदात्त आहे.

आजच्या काळात शिक्षकाला कल्पनेनुसार, बुध्दीनुसार व विचारानुसार परिवर्तन घडवून आणावयाचे आहे. अतिशय उत्साहवर्धक वातावरणात नवचैतन्याची पालवी फुलवित राहिले पाहिजे. शिक्षकाने समाज व राष्ट्रघडणीचा ध्यास सतत ठेवला पाहिजे.

शिक्षकाची भूमिका ही पारदर्शक असावी, कारण त्यांच्या भूमिकेतून समाजपरिवर्तनाचे काम होत असते. माणसांत व समाजांत सतत परिवर्तन होत असते. मांत्र, योग्य परिवर्तन व्हावे, अयोग्य परिवर्तन होऊ नये याची काळजी शिक्षकांनी घ्यावी.

देशांतर्गत भेदांमुळे समस्या या पराकोटीला गेल्या आहेत. समाजातील भाषाभेद, प्रांतभेद, धर्मभेद, जातीभेद यांमुळे समाज दुबळा बनला आहे. अशा परिस्थितीत उद्याचा समाज घडवित शिक्षकास अनेक आव्हाने स्वीकारून भूमिका पार पाडावयाची आहे.

भारतीय समाजातील वर्णव्देष, अंधश्रध्दा, परंपरा, रूढी, अज्ञान यांच्या श्रृखलेत समाज जीवन अडकलेले आहे. ते प्रगतीला सतत अडथळे निर्माण करतात. म्हणून २१ व्या शतकात ही आव्हाने डोळयांसमोर ठेवून कामाचे नियोजन करावे लागेल.

आजचा विद्यार्थी केवळ परीक्षार्थी बनला आहे. संस्कारक्षमतेचा अभाव होत आहे. त्यांच्यावर आचार–विचारांची आणि नैतिक मूल्ये रूजविण्याची भूमिका शिक्षकाला बजवावी लागेल. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे तेव्हा विद्यार्थ्यांना घडवितानाच आदर्श नागरिक बनविण्याची जबाबदारी सुध्दा शिक्षकाची आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरावी. विद्यार्थ्यांकरिता उद्योगधंदे व व्यवसायाची कौशल्ये निर्माण करावी लागतील. त्यांच्या अनुभवांच्या कक्षा अधिक रूंदाविण्याची गरज आहे.

शिक्षकाने आपली जुनी चाकोरी सोडून नवीन बदल, अध्यापन तंत्रे, मूल्यमापन व नव संशोधनाकडे वळून ज्ञानाचे संस्कार केले पाहिजेत. त्यातून आजचा शिक्षक संवेदनक्षम, प्रयोगशील, लवचीक व नावीन्याची जाणीव ठेवणारा तयार करावा लागेल. जुन्या विचारप्रवाहातील चांगल्या बाबी ठेवून नवीन स्वीकारण्याची जबाबदारी आजच्या काळात शिक्षकांची आहे. उदा. मातृभूमीवरील प्रेम, सांस्कृतिक ऐक्य, भारतीय तत्त्वज्ञान हे दूर करता कामा नये. विद्यार्थ्यांनी चिकित्सक वृत्ती, विज्ञाननिष्ठता, नवीन संशोधन यांचा स्वीकार केला पाहिजे.

कोठारी आयोगाने म्हटल्याप्रमाणे, भारताचे भवितव्य वर्गावर्गांत घडत आहे. ("Density of India is being shaped in its classroom.")

नव्या युगाचा साक्षात्कार स्वीकारून, देशाचा चेहरामोहरा पार बदलवून त्याचा एक विलोभनीय समाज घडविण्याची फार मोठी जबाबदारी आजच्या शिक्षकावर आहे. शिक्षक हा निवेदक, नियोजनकार, दूरस्थ शिक्षण देणारा, सल्लागार, समुपदेशक, अनौपचारिक व औपचारिक शिक्षण देणारा असावा.

**संदर्भ :**

*डॉ. के. के.जाधव, आधुनिक काळातील शिक्षण – तत्त्वज्ञान, मन प्रकाशन, नाशिक.*
*डॉ. के. के.जाधव, नवीन काळाचे शिक्षण – तत्त्वज्ञान व समाजशास्त्र, मन प्रकाशन, नाशिक*